**<u>निशाणी क्र.१५ वरील आदेश</u>**
**(दि.१२/०२/२०२६)**

वादींनी सदरचा अर्ज हा मोजणी नकाशा प्रमाणे हद्दीखुणा कायम करणेबाबतचा आदेश होण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. वादींचे कथन असे की, सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्ताद्वारे मोजणी झाली आहे व मोजणी अहवाल न्यायालयात दाखल झाला आहे. मोजणी नकाशाप्रमाणे हद्दीखुणा कायम करणेबाबतचा आदेश करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांना पुरेसा वेळ देऊनही त्यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दिलेले नाही. म्हणून सदरचा अर्ज हा प्रतिवादी यांच्याविरूध्द विना लेखी म्हणणे चालविण्यात येतो.

४. सदर अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यामध्ये अद्यापपर्यंत वादीचा पुरावा झालेला नाही. तसेच मोजणी अधिकारी यांचाही पुरावा वादीने दिलेला नाही. सदर मोजणी नकाशास हा वादीने मोजणी अधिकारी यांच्याकडून सिध्द केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये सदरचा अर्ज वेळेपुर्वी दिलेला दिसून येत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज सद्यस्थितीला मंजुर करणे न्योयाचित होणार नाही.  म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-
(श्रीमती एल. एन. पांचाळ)
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
घनसावंगी.

दिनांक १२/०२/२०२६